क्र.लाप्रवि/मु./अे-३/ प्रिंटर टोनर/ काट्रेज (वा.दे.क.)/प्रसिध्दी/०२/ २०२४/ 4443
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई, वरळी पोलीस कॅम्प, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई-४०० ०३०.
दि. 18/०९/२०२५.

**-: दरपत्रकाबाबतच्या सुचना :-**

**विषय :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म,राज्य, मुंबई या कार्यालयातील उपलब्ध असलेल्या प्रिंटर्स मधील टोनर रिफींलीगचा वार्षिक देखभाल करार करण्याबाबत.**

******

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई मुख्यालय या कार्यालयात खालील कपंनीचे ६० ते ६५ प्रिंटर्स कार्यान्वीत आहे.

| अ.क्र. | प्रिंटर्स |
|---|---|
| ०१ | HPLJ PRO M२०८DW |
| ०२ | Laser Jet Pro M२०३dn |
| ०३ | Laser Jet Pro P1108 Plus |
| ०४ | Cannon ३०३ |
| ०५ | Cannon ९२५ |

उपरोक्त प्रिंटर्समधील टोनर रिफींलीग / रिसायकलींग करण्याबाबतच्या इच्छुक पुरवठादार कंपनीकडून कमीत कमी दराची दरपत्रके मोहरबंद पाकीटामध्ये मागविण्यात येत आहेत. याबाबत अटी व शर्ती सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे आहे.

--००अटी व शर्ती०००---

१. सीलबंद दरपत्रके दि. २३/०९/२०२५ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये सायंकाळी १८.१५ वा पर्यंत कार्यालयात जमा करावी. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२. मोहोरबंध लिफाप्यांवर प्रिंटर्समधील टोनर रिफींलीग / रिसायकलींग याबाबत वार्षिक देखभाल करार असे लिहिणे आवश्यक आहे. एका पुरवठादारास एकच निविदा सादर करता येईल.

३. दरपत्रक फॉर्मवर दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.

४. दरपत्रक मोहोरबंध लिफाफे उघडतेवेळी दरपत्रकधारक स्वत: किंवा त्याचा एक प्रतिनिधी स्वखर्चाने उपस्थित राहू शकतो.

५. दरपत्रक कागदपत्रात कुठेही खाडाखोड/ ओव्हरराईटिंग (गिरवणे) पांढरी शाई लावणे टाळावे. चुकुन तसे करावे लागल्यास त्यावर पूर्ण स्वाक्षरी करावी.

६. दरपत्रक धारक कंपनीने या कार्यालयातील अधिकाऱ्यांबरोबर हितसंबंध नसल्याबाबत आणि एकच निविदा दिल्याबाबतचे हमीपत्र दरपत्रकासोबत दयावे.

७. कोणतेही एक अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा, संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे किंवा दरपत्रक स्वीकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार, हे कार्यालय राखून ठेवत आहे.

८. दरपत्रके दि. २४/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर पोलीस अधीक्षक मुख्यालय यांचे दालनात उघडण्यात येतील.

९. दरपत्रके स्वीकारण्याबाबतचा अंतिम निर्णय या कार्यालयाचे विभाग प्रमुख यांचा राहिल.

१०. दरपत्रक स्वीकृती तारखेपासून प्रिंटर्समधील टोनर रिफींलीग / रिसायकलींग यांचा वार्षिक देखभाल करार करण्याबाबत पुढील अटी व शर्तीची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१. प्रिंटर टोनर/ काट्रेज रिफिलींग व रिसायकलिंग करणेसाठी संपर्क साधला असता पुढील २४ तासाच्या आत रिफिलींगबाबतची कार्यवाही पुर्ण होणे आव्रश्यक आहे. विलंब झाल्यास प्रतीदिन १०० दंड आकारण्यात येईल.

२. प्रिंटर टोनर/ काट्रेज रिफिलींग/ रिसायकलींग करतांना वापरावयाचे साहित्य दर्जेदार असणे आवश्यक आहे.

३. प्रिंटर टोनर/ काट्रेज कारटेज रिफिलींग/ रिसायकलींग करण्याकरिता ट्रोनर कार्यालयातून घेऊन न जाता, समक्ष कार्यालयात येऊन रिफिलींग करणे आवश्यक आहे.

तरी मुद्दा क्र. १० मधील १ ते ३ अटी व शर्ती मान्य असेल तर निविदाकराच्या दरपत्रकाबाबत विचार करण्यात येईल.

(अरूण पाटील)
अपर पोलीस अधीक्षक (मुख्या-२)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

सर्व इच्छुक कंपन्या.

प्रत कार्यवाहीस्तव

पोलीस निरीक्षक, संगणक शाखा, लाप्रवि, म. राज्य, मुंबई.

२/- उपरोक्त पत्राची प्रत सोबत जोडली असून, सदरचे पत्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे संकेतस्थळावर दि. २२/०९/२०२५ पर्यंत प्रसिध्दी राहील याप्रमाणे प्रसिध्द करण्यात यावे.